चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
२५जुन, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : cybercell.chandrapur@mahapolice.gov.in
: (PRO)

# पिडीत विवाहीत महीलेची विदेशातुन सुटका, चंद्रपुर पोलीसांची कामगीरी.....

दिनांक:२०/०६/२०१९ रोजी पडोली येथील सयद अमीनुर रहेमान यांनी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली की, त्यांच्या बहीणीचे हैदराबाद येथील शेख शाबाद याचेसोबत दोनवर्षापुर्वी लग्न झाले. लग्नांनतर शेख शाबाद हा Lilonwge Malawi या आफ्रीकन देशामध्ये एका सिड्स कंपनीमध्ये नोकरी करतो त्याने काही महीन्यांपुर्वी त्याची पत्नी, (सयद अमीनुर यांची बहीण) हीला Lilonwge Malawi येथे सोबत घेवुन गेला. परंतू, शाबाद हा पत्नीचे चारीत्र्यावर संशय घेवुन तीचा शारीरीक व मानसिक छळ करीत होता. अशातच शाबाद याने तिचा पासपोर्ट सुध्दा पत्नीजवळुन घेवुन पत्नीला Lilonwge Malawi येथे एकटीला सोडुन हैदराबाद येथे निघुन आला आणि शाबाद हा फोनवरुन तीला मारण्याच्या धमक्या देत होता.

वरील सर्व हकीकत सयद यांचे बहीणीने दिनांक:१९/०६/२०१९ रोजी फोनवर सयद यांना सांगितली तेव्हा घरातील सर्व लोक घाबरुन गेले. कारण त्याची बहीण ही विदेशात होती आणि तीचेजवळ जाणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे सयद अमीनुर यांनी ताबोडतोब पोस्टे पडोली येथे जावुन प्रभारी अधिकारी यांना सर्व हकीकत सांगीतली तेव्हा विवाहीत महीला ही विदेशात असल्याने प्रभारी अधिकारी यांचेसमोर एक आवाहन उभे ठाकले. त्यामुळे त्यांनी तात्काळ पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी चंद्रपुर यांना सर्व माहीती दिली. पोलीस अधीक्षक यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता स्वत: तक्रारदार सयद अमीनुर यांना कार्यालयात बोलावुन घेतले. तक्रारदार हे अतिशय घाबरलेल्या अवस्थेत असताना त्यांना धीर दिला व तक्रारीचे अनुषंगाने विदेशात असणारे पिडीत महीलेसोबत स्वत: फोनद्वारे तात्काळ सपंर्क करुन घाबरण्याचे कारण नाही, तुम्हाला भारतात परत तुमच्या घरी आणण्याकरीता चंद्रपुर पोलीस सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहेत असा धीर देवुन. High commission Of India, Lilonwge Malawi येथील Consuler यांचेसोबत रात्रीच ईमेलद्वारे तात्काळ सपंर्क करुन पिडीत महीलेला मदत व भारतात परत पाठविण्याबाबत कळविले. Consuler यांनी सुध्दा तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेवुन तात्काळ कार्यवाही करुन महीलेसोबत सपंर्क करीत असल्याबाबत पोलीस अधीक्षक यांना संदेशाद्वारे कळवुन महीलेला व सयद अमीनुर यांना सुध्दा फोनकरुन मदत पोहचवित असल्याचे सांगितले.

दिनांक:२०/०६/२०१९ रोजी Consular यांनी पिडीत महीलेला तात्काळ दुपारच्या विमानाने Lilonwge, Malawi येथुन भारतात परतण्याकरीता रवाना केले. पिडीत महीला दिनांक:२१/०६/२०१९ रोजी सकाळीच मुंबई येथे पोहचली व दुसऱ्याच दिवशी चंद्रपुर येथे तीचे नातेवाईकांकडे माहेरी परत आली आहे. चंद्रपुर येथे परत आल्यानंतर पिडीत महीला तीचे भाउ व घरातील मंडळीनी पोलीस अधीक्षक यांना भेटुन चंद्रपुर पोलीस दलाच्या या कार्यतत्परतेचे कौतुक केले आहे.

पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांनी स्वत: या प्रकरणामध्ये लक्ष देवुन एक भारतीय महीला विदेशामध्ये कौटुंबिक अत्याचाराची बळी होत असताना तीला भारतात सुखरुप परत आण्याकरीता चंद्रपुर जिल्हा पोलीस दलाचे नेतृत्व, कर्तव्यदक्ष असल्याचे अधोरेखित करतानाच चंद्रपुर पोलीस दल व High commission Of India महीलांना संकटकाळी सहाय करण्याकरीता तत्पर असल्याचे या प्रकरणातुन दिसुन येत आहे.

—————————————————————————————————————